2023-24_5th_ 3B

नाव :- ----------------------------

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

**पाचवी** **मराठी** **गुण :- ३०**

पठीत गद्य - ७ पाठांतरित प्रश्न - ७ व्याकरण- १४ लेखन कार्य - २

---

**प्रश्न १ ला पठीत गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा : ७**

मी आहे नदी. माझा जन्म पर्वतावर होतो. मला अनेक ओढे येऊन भेटतात. त्या ओढ्यांमुळे मी मोठे होत जाते. इतर नद्याही मला येऊन मला मिळतात. मी उड्या मारते, धावते. उंच कड्या-वरून वेगाने कोसळते. धबधब्याच्या रूपाने पर्वतावरून खाली येते. माणसे धारण बांधून मला अडवतात. माझ्या पाण्यावर वीज तयार करतात. त्या विजेवर कारखाने चालवतात. शेतातील पंप चालवतात. पिण्यासाठी पाण्याचा वापर करतात. पर्वतउतारावरून मी सपाट मैदानी भागात येते. आता माझा वेग कमी झालेला असतो. माझ्या दोन्ही किनाऱ्यावरील परिसर मी हिरवेगार करते. माझ्यामुळे शेतकरी शेतात भरपूर धान्य पिकवतात; पण मला एका गोष्टीची खंत आहे. मी सगळ्यांच्या उपयोगी पडते, तरीही माणसे माझ्या प्रवाहात सांडपाणी सोडतात, कचरा टाकतात, मला प्रदूषित करतात. माणसाच्या वस्त्या, छोटी गावे, शहरे यांच्या जवळून वाहत जाताना मी जास्तच प्रदूषित होते. तरीही मी पुढे पुढे जाताच राहते. मी कुठेही थांबत नाही. "थांबला तो संपला" असेच मी सगळ्यांना सांगत असते. शेवटी मी सागराला जाऊन मिळते आणि नदी म्हणून माझा प्रवास थांबतो.

**अ) चौकट पूर्ण करा : ३**

१. माणसे नदीला अडवायला काय बांधतात ? ⇒ [ ]

२. धरणाच्या वाहत्या पाण्यावर काय तयार होते ? ⇒ [ ]

३. शेवटी नदी जाऊन कोणाला मिळते ? ⇒ [ ]

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा : ( कोणतेही दोन ) २**

१. नदी आपल्याला कोणता संदेश देते?

२. नदीचा जन्म कोठे होतो?

३. नदीचा वेग कधी कमी होतो?

**क. नदीचे प्रदूषण कमी होण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न कराल? २**

LIVEWORKSHEETS

**प्रश्न २ रा पाठांतरित प्रश्नांची उत्तरे लिहा :** **७**

**अ. एका वाक्यात उत्तरे लिहा :** **३**

१. मंजुळ गाणे कोण गाते?

२. मुलांची सहल कोठे गेली होती?

३. तुम्ही पैशाचे व्यवहार कोठे करता?

**ब)चूक की बरोबर ते लिहा :** **२**

१. नदीचे पाणी खारट असते.

२. मुले सायंकाळी घरी परतली.

**क) तुम्ही पाण्याची बचत करण्यासाठी काय कराल?** **२**

**प्रश्न ३ रा व्याकरण** **१०**

**अ) खालील वाक्यातील नाम ओळखा** **२**

१) राम आंबा खातो.

२) झाडावर रंगबेरंगी फुले आहेत.

**आ) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा** **२**

१) आई मला खाऊ देते. ती मला आवडते.

२) माझा दादा खूप हुशार आहे. त्याचा वर्गात पहिला नंबर येतो.

**इ) खालील वाक्यातील विशेषण ओळखा** **२**

१) गुलाब लाल आहे.

२) तबसून दीदी गोरी आहे.

**ई) वाक्यात योग्य विरामचिन्ह वापरा.** **२**

१) बागेत जाई जुई चमेली आणि गुलाबाची फुले आहेत

२) मला गुलाबी रंग आवडतो

**उ) समानार्थी शब्द लिहा.** **२**

१) आई = २)झाड =

**ए) क्रियापदाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **२**

१) मी रात्री लवकर ------------------- (झोपणे)

२) राजू क्रिकेट ------------------------ (खेळणे)

LIVEWORKSHEETS

क) जोड्या लावा. २

| अ गट | उत्तर | ब गट |
|---|---|---|
| 1) झुळझुळ | | अ) गाणे |
| 2) मंजुळ | | आ) छाया |
| 3) शीतल | | इ) पाणी |

**प्रश्न ४ था लेखन कार्य** २

अ. खालील एका विषयावर निबंध लेखन करा:

१) मी नदी बोलते............ **किंवा** १) आमची सहल...................

**प्रश्न ४ था व्याकरण** १०

**अ. क्रियापदाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा :(कोणतेही तीन)** ३

३) मी रात्री लवकर ------------------- (झोपणे)

४) राजू क्रिकेट ------------------------ (खेळणे)

५) सुमन टी व्ही जवळून ------------- (पाहणे)

६) विकी सकाळी अभ्यास ------------ (करणे)

**ब) खालील वाक्यात अधोरेखित शब्दांचा समानार्थी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा :** २

१) बागेमध्ये आब्यांचा तरू आहे.

२) तलावात खूप जल आहे.

LIVEWORKSHEETS

**ख) जोड्या लावा.**

| अ गट | उत्तर | ब गट |
|---|---|---|
| 4) झुळझुळ | | अ) गाणे |
| 5) मंजुळ | | आ) छाया |
| 6) शीतल | | इ) पाणी |

ड) **'थांबला तो संपला'** यासारखी सुवचणे सांगा. २

*************** **समाप्त** ***************

LIVEWORKSHEETS